नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ४ । वर्ष : ४ थे । अंक : २७० । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे    POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




रविवार दि. १३ सेप्टेंबर २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# नवी मुंबई कोकण विभागीय कार्यालयात पत्रकार संघाच्या कार्यकारिणीची बैठक संपन्न!

## नवी मुंबई जिल्हाध्यक्षपदी दशरथ चव्हाण; उपाध्यक्षपदी कल्याणराव हनुवते, कार्याध्यक्षपदी जवाहरलाल पोळ तर सचिवपदी विष्णू बुरे

नवी मुंबई (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईच्या नवी मुंबई कोकण विभागीय कार्यालयात दि. १० सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ८ वाजता कार्यकारिणीची बैठक उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष श्री. निलेश सोमाणी, प्रदेश संघटक श्री. संजय भोकरे, महासचिव डॉ. विश्वासराव आरोटे, राज्य प्रसिद्धी प्रमुख श्री. नवनाथ जाधव आणि कोकण विभागीय अध्यक्ष श्री. राकेश खराडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठक पार पडली.

बैठकीत संघाच्या संघटनात्मक कामकाजाचा आढावा घेण्यात आला. तसेच नवी मुंबई व कोकण विभागातील पत्रकारांच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. पत्रकारांच्या



अडचणी सोडविण्यासाठी संघाच्या माध्यमातून प्रभावी पाठपुरावा करणे, पत्रकारांच्या हितासाठी विविध उपक्रम राबविणे, संघटना अधिक सक्षम करणे तसेच नवी मुंबईसह कोकण विभागात संघटनेचा विस्तार करण्याबाबत पदाधिकाऱ्यांनी विचार मांडले.

यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या नवी मुंबई जिल्हा कार्यकारिणीची निवड करण्यात आली. नवी मुंबई जिल्हाध्यक्षपदी दशरथ चव्हाण, जिल्हा उपाध्यक्षपदी कल्याणराव हनुवते, कार्याध्यक्षपदी जवाहरलाल किसन पोळ तर सचिवपदी विष्णू सुखदेव बुरे यांची निवड करण्यात आली.

बैठकीस कोकण विभागीय अध्यक्ष राजेश खराडे, खजिनदार असते आलम मिर, सल्लागार सुनील गायकवाड व सुभाष फकीरा जाधव, वाशी विभाग प्रमुख दीपक जयराम सोनवणे, तसेच सदस्य समीर मेहबूब शेख, संतोष जगन्नाथ गोळे, कलाम अरुण शहा, सुरेश मनोहर दुधाने, विनोद बाबुराव धुरंदर आणि जितेंद्र साईनाथ चव्हाण आदी उपस्थित होते.

नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी पत्रकारांच्या विविध प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करून संघटनेच्या माध्यमातून पत्रकारांना न्याय मिळवून देण्यासाठी एकजुटीने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. नवी मुंबई व कोकण विभागात संघटनेची ताकद अधिक वाढविण्यासाठी आगामी काळात विविध उपक्रम राबविण्याचे यावेळी निश्चित करण्यात आले.

# शिक्षण हक्क कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी देखरेख प्रणाली विकसित करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## राज्यातील चॅरिटेबल ट्रस्टच्या शाळांबाबत पाऊल

मुंबई (समर्थ गांवकरी)




महाराष्ट्रातील सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्टद्वारे चालविल्या जाणाऱ्या शाळांमध्ये शिक्षण हक्क कायद्याची (RTE) प्रभावी व पारदर्शक अंमलबजावणी व्हावी, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे.

राज्यातील अशा सर्व अनुदानित आणि विना अनुदानित शाळांवर नियंत्रण व देखरेख ठेवण्यासाठी मानक कार्यप्रणाली, संनियंत्रण आणि मूल्यमापन यंत्रणा तातडीने विकसित करावे. धर्मदाय रुग्णालयातील कार्यपद्धतीप्रमाणे धर्मदाय संस्था अंतर्गत कार्यरत शाळांमध्ये शिक्षण हक्क कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी देखरेख कार्यपद्धतीची कायदेशीर प्रक्रिया वेगाने पूर्ण करावी.

महाराष्ट्रामध्ये सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर शाळांचे संचालन केले जाते. या शाळांमध्ये शिक्षण हक्क कायद्यांतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकांतील मुलांना प्रवेश मिळणे अनिवार्य आहे. मात्र, या शाळांमधील पारदर्शकता आणि नियमावलीच्या अंमल बजावणीबाबत वारंवार तक्रारी समोर येत होत्या.

या पार्श्वभूमीवर, राज्यातील सर्व गरजू आणि पात्र विद्यार्थ्यांना आरटीई कायद्याचा प्रत्यक्ष लाभ मिळावा आणि शिक्षणाचा दर्जा कायम राहावा, यासाठी एक आधुनिक व डिजिटल प्रणाली अस्तित्वात आणणे अत्यावश्यक आहे. सार्वजनिक 'चॅरिटेबल ट्रस्ट'द्वारे चालविल्या जाणाऱ्या रुग्णालयांमध्ये गरीब रुग्णांना मोफत व सवलतीच्या दरात आरोग्य सुविधा मिळतात की नाही, यावर नियंत्रण यंत्रणेद्वारे देखरेख ठेवली जाते, त्याच धर्तीवर आता शाळांसाठीही ही यंत्रणा लागू केली जाणार आहे.

मुख्यमंत्र्यांच्या या विशेष प्रयत्नांमुळे राज्यातील हजारो शाळांमधील प्रवेश प्रक्रिया, शैक्षणिक सोयी-सुविधा आणि आरटीई अंतर्गत मिळणाऱ्या निधीचा योग्य वापर यावर थेट प्रशासकीय लक्ष राहील. तसेच या यंत्रणेद्वारे शाळांचा नियमित आढावा घेणे शक्य होणार असून, गैरप्रकारांना आळा बसण्यास मोठी मदत होणार आहे.

ही प्रणाली लवकरात लवकर कार्यान्वित करण्यासाठी विधि व न्याय विभाग, आवश्यक ते तांत्रिक तज्ज्ञ यांच्यामध्ये योग्य तो विचारविनिमय करून एक सर्वसमावेशक प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हा प्रस्ताव तयार झाल्यानंतर त्याला आवश्यक त्या आर्थिक मंजुऱ्या देऊन तातडीने अंमलबजावणी सुरू केली जाणार आहे.

# शाळांचा दर्जा अधिक उंचावणे, विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील शिक्षणासाठी सर्वतोपरी मदत : उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

दैनिक
महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी
नियमित वाचा

## आदर्श शिक्षकांचा उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मान

बारामती (समर्थ गांवकरी)

शिक्षण हे सर्वात मोठे शस्त्र असून शिक्षक ही राष्ट्राची खरी संपत्ती आहे. बारामती शहर नेहमीच शैक्षणिक व सामाजिक प्रगतीचे केंद्र राहिले आहे. बारामती तालुक्यातील शाळांचा दर्जा अधिक उंचावण्यासाठी व विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरचे शिक्षण देण्यासाठी सर्वतोपरी मदत केली जाईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिली.

पंचायत समितीच्यावतीने आयोजित आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळ्यात त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे, उपसभापती विवेक वळसे पाटील, पंचायत समिती सभापती किरण तावरे, उपसभापती शुभांगी आगवणे, नगराध्यक्ष सचिन सातव, उपविभागीय अधिकारी उत्तम दिघे, गट विकास अधीकारी किशोर माने,तहसीलदार स्वप्नील रावडे,आरोग्य अधिकारी मनोज खोमणे उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, विद्यार्थ्यांना योग्य दिशा देण्याची महत्त्वाची जबाबदारी शिक्षकांवर आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकातील ज्ञान न देता त्यांच्यामध्ये सत्यनिष्ठा, देशप्रेम आणि वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवावा. पुणे जिल्हा ही शिक्षणाची पंढरी आहे. या समृद्ध शैक्षणिक परंपरेत शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शिक्षक हे समाज आणि राष्ट्राचे खरे शिल्पकार असून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण करण्याचे कार्य ते करतात.

बारामती तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान उल्लेखनीय आहे. या शाळांमध्ये शिक्षण घेणारी मुले ही ग्रामीण महाराष्ट्राची खरी ताकद असून त्यांच्या गुणवत्ता आणि क्षमतेला योग्य दिशा देण्याचे काम शिक्षकांनी करावे. महाराष्ट्र ही संत, समाजसुधारक आणि शिक्षणतज्ज्ञांची भूमी आहे. राज्यातील अनेक शिक्षकांनी आपल्या कार्यातून राष्ट्रीय तसेच




आंतरराष्ट्रीय स्तरावर लौकिक मिळवला आहे, असेही त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, राज्य शासनाने शिक्षण आणि शिक्षण क्षेत्राच्या विकासाला नेहमीच अग्रक्रम दिला आहे. बदलत्या काळानुरूप शिक्षकांनी अद्ययावत तंत्रज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना कौशल्याधारित शिक्षणासोबतच समस्या निराकरण, टीमवर्क आणि मूल्याधारित शिक्षणाची जोड देत त्यांच्यामध्ये सद्गुणांची रुजवणूक करावी. स्पर्धेच्या युगात आत्मविश्वासाने परिस्थितीला सामोरे जाणारी सशक्त पिढी घडविण्याची जबाबदारी शिक्षकांची आहे.

# निळवंडे शाळेत 'हे गीत वामनाचे' शाहिरी जलसा उत्साहात

## आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत अनोख्या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना वामनदादांच्या विचारांचा जागर

संगमनेर (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर जिल्हा परिषद आयोजित 'आनंददायी शनिवार' उपक्रमांतर्गत जि. प. प्राथमिक शाळा, निळवंडे (ता. संगमनेर) येथे 'हे गीत वामनाचे' या अनोख्या शाहिरी जलशाचे आयोजन करण्यात आले. शाहीर वामनदादा कर्डक यांच्या कविता व पोवाड्यांच्या सादरीकरणातून विद्यार्थ्यांना त्यांच्या साहित्याचा व सामाजिक विचारांचा परिचय करून देण्यात आला.

दिंडोरी (जि. नाशिक) येथे ग्रामविकास अधिकारी म्हणून कार्यरत असलेले तसेच शाहीर वामनदादा कर्डक यांच्या वंशावळीतील नातू सुभाष कर्डक यांनी आपल्या बहारदार गायनातून विद्यार्थ्यांची मने जिंकली. 'माणसा इथे मी तुझे गीत गावे', 'असे गीत गावे तुझे हित व्हावे', 'हा थुई थुई वारा', 'अरे सांगा मला टाटा बिर्ला', सांगा ना या वेडीला', 'चल ग हरिणी तुरुतुरु', 'ही फियाट गाडी माझी म्हणू का', 'नव हे नवाळीच', 'तुफानातले दिवे आम्ही', 'मी वादळ वारा', 'काल मुजरेच केले रे' यांसह डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील पोवाड्यांचे सादरीकरण करण्यात आले. या गीतांनी व पोवाड्यांनी विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध करत महाकवी वामनदादा कर्डक यांच्या विचारांचा जागर केला.

शाळेचे मुख्याध्यापक रमेश निघुते यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रमशील शिक्षक अनिल कडलग यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दत्तात्रय आहेर होते.

अध्यक्षीय मनोगतात दत्तात्रय आहेर यांनी वामनदादा कर्डक यांच्या जीवनकार्याची व साहित्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांच्या कार्याचा वामनदादा कर्डक यांच्या जीवनावर मोठा प्रभाव होता असे प्रतिपादन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ शिक्षक कैलास दिघे यांनी केले. तुषार फल्ले यांच्या बहारदार सूत्रसंचालनाने कार्यक्रमात रंगत आणली. पाहुण्यांचा परिचय अनिल गाडेकर यांनी करून दिला तर आभार प्रदर्शन सौदामिनी सोनवणे यांनी केले.



कुमारी वेदिका शरद पवार    कुमारी काव्या सतीश पवार





# महाराष्ट्र बालक मंदीर शाळेतील पालक शिक्षक सहविचार सभा उत्साहात संपन्न

## परस्पर सहकार्याने प्रगती साधण्यावर पालक सहविचार सभेचे एकमत

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या महाराष्ट्र बालक मंदिर मध्ये पालक शिक्षक सहविचार सभेत परस्पर सहकार्यांने मुलांची प्रगती साधण्यावर शिक्षक व पालकांनी भर द्यावा यासाठी सर्वतोपरी सहकार्य करू असा निर्धार सभेने व्यक्त केला.यावेळी व्याख्येते प्रा. मारूती शेळके, माजी मुख्याध्यापक सुरेश शेवाळे, मुख्याध्यापिका सौ सुनीता शेवाळे, पालक वनरक्षक राजश्री पिंपळे, डॉ.नितीन रांधवण, प्रा. संदिप गिऱ्हे, राजेंद्र लोखंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

मारूती शेळके म्हणाले शाळेपेक्षा कुटुंबात आपल्या पाल्य अठरा तास असतो घरात मात्र त्याला अनेक अनुभव मिळतात, या अनुभवातून तो घडत असतो म्हणून आईवडील म्हणून पाल्याला घडवायचा संकल्प करू या. आईवडीलांनी संस्कार रूजवा,मुलांना घडवा, अडचणी, संकटाना न घाबरता संकटाशी सामना करायला शिकवा. अपयश पचवायला शिकवा अपयश म्हणजे माणसाला घडवण्यासाठी येणारी गोष्ट. संकट म्हणजे माणसाला शक्तीशाली बनवणारी गोष्ट आहे. त्यामुळे संकटाला घाबरायचे नाही, अपयशाने खचू जायच नाही ते आपल्या जीवनात आणू या. छत्रपती शिवाजी महाराज, एडीसन यांच्या आईनी आपले मुले अनेक संकटाशी सामन करत कशी घडवली ते सांगितले. कोणत्या गोष्टीचा बाउ न करता त्यांनी यशस्वी होउ दाखवले. आज प्रत्येक पालकात चिंता असते आपले पाल्य कसा घडेल परंतू त्याला या जगाशी सामना करू दया ज्याप्रमाणे सोन्याला चकाकी येण्यासाठी व हिरे चांगला होण्यासाठी हिऱ्याला व सोन्याला झोकून दयावे लागते तसेच पाल्यालाही संकटाशी सामना करू दया.

मुख्याध्यापिका सौ. सुनीता शेवाळे म्हणाल्या पालक व मुलाचा संवाद हरवत चालला आहे पालकांनी टीव्ही, व्हाटसअॅप वर वेळ न घालवता मुलांकरीता वेळ दयायला हवा पालकासमवेत मुलही आज टीव्ही व इतर गोष्टीकडेच लक्ष देत आहे मैदानी खेळ खेळत नाही मुले ही अनुकरणप्रिय असून पालकांच्या हातातील मोबाईल त्यांच्या व्यक्तिमत्व विकासावर नकळत पणे परीणाम करतो मुलांकरीता पालकांनी वेळ काढायला हवा यावेळी शेवाळे यांनी पालकांना मार्गदर्शक सूचना केल्या व त्यांच्या समस्याचे निराकरण केले. पालकांच्या सर्व सूचनांचा नोंदी आम्ही घेतल्या असून त्यांचा जास्तीत जास्त अंर्तभाव केला जाईल अशी ग्वाही दिली.

श्रीमती भारती तांबे यांनी कुटुंबासह मुलांच्या आहारात तृण धान्यांचा समावेश करावा, त्यांना दररोज खेळण्यासाठी वेळ द्या, पालकांनी मुलांशी संवाद ठेवावा, मुलांना क्षमतेनुसार फुलू द्या आदी सूचना केल्या. तृणधान्ये वापर व उपयोग याविषयी माहिती सांगितली.




निशा चौधरी यांनी पालकांनी मुलांशी प्रेमाने संवाद साधावा कोणत्याही प्रकारची बळजबरी करू नये मुलांच्या समस्या बाबत माहिती देत पालकांच्या शंकाचे निरासन केले यावेळी माजी मुख्याध्यापक सुरेश शेवाळे,पालक वनरक्षक राजश्री पिंपळे, डॉ.नितीन रांधवण, प्रा. संदिप गिऱ्हे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी मोठया संख्येने पालक उपस्थित होते. सूत्रसंचालन आशा कराळे यांनी केले. आभार सुनिता सासवडे यांनी मानले.कार्यक्रम यशस्वितेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परीश्रम घेतले.

# समाज प्रश्नांवर संशोधनातून उपाय शोधा : प्रा. संतोष काळे

जुन्नर (समर्थ गांवकरी)

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे,अण्णासाहेब वाघिरे कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,ओतूर यांच्या वतीने विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्ती,जिज्ञासू वृत्ती नवकल्पना आणि नवोन्मेषाला चालना देण्यासाठी 'आविष्कार संशोधन स्पर्धे'चे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेत ७३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन आपल्या संशोधनाचे सादरीकरण केले. अशीमाहिती आविष्कार संशोधन स्पर्धेचे समन्वयक साधू कोळेकर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश शिरसाट यांनी दिली.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना आविष्कार संशोधन स्पर्धेचे समन्वयक साधू कोळेकर यांनी आविष्कार उपक्रमामागील भूमिका, उद्दिष्टे आणि दिशा याविषयी सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड निर्माण व्हावी, त्यांच्या कल्पनांना योग्य व्यासपीठ मिळावे तसेच समाजातील विविध प्रश्नांकडे वैज्ञानिक व चिकित्सक दृष्टिकोनातून पाहण्याची सवय लागावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. संतोष काळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आविष्कार संशोधन स्पर्धेतील विद्यार्थ्यांचा सहभाग दिवसेंदिवस कमी होत असल्याबद्दल चिंता व्यक्त केली. आजचा विद्यार्थी मिथकांमध्ये अधिक जगताना दिसतो. त्यामुळे कोणतीही घटना,रूढी किंवा परंपरा स्वीकारण्यापूर्वी ती विज्ञाना च्या कसोटीवर तपासून पाहिली पाहिजेत.नैसर्गिक आपत्तींच्या निर्मितीमध्ये मानवी हस्तक्षेपाचे प्रमाण वाढत असल्याचे सांगून त्यांनी आविष्कारसारख्या संशोधन स्पर्धांच्या माध्यमातूनविद्यार्थ्यां नी पर्यावरणीय व सामाजिक समस्यांवर शास्त्रीय दृष्टिकोना तून उपाय सुचवावेत,असे आवाहन केले.दैनंदिन जीवना तील घटना,रूढी-परंपरा व समजुती यांचा चिकित्सकपणे विचार करून त्यामागील वैज्ञानिक सत्य शोधण्याची गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रमेश शिरसाट यांनी,गेली १८ वर्षे महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आविष्कार संशोधन स्पर्धेचे आयोजन करीत आहे, असे सांगितले. विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासक्रमापुरते मर्यादित न राहता अशा संशोधनात्मक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा. समाजासमोरील विविध प्रश्न ओळखून त्यांची कारणे शोधणे आणि त्यावर व्यवहार्य उपाय सुचविणे हीच संशोधनाची खरी दिशा आहे, असे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमासाठी महाविद्याल याचे उपप्राचार्य के.डी. सोनावणे ज्येष्ठ प्राध्यापक एकनाथ कबाडी,मराठी विभागप्रमुख वसंत गावडे, अंतर्गत गुणवत्ता कक्षाचे समन्वयक योगेश्वर काळदंते, राहुल पाटील,आशुतोष ठाकरे परीक्षा नियंत्रक धनंजय गडगे, हरिभाऊ बोराटे,पवन हांडे, विद्याश्री कोठावळे,सुवर्णा डुंबरे,रत्नमाला मोरे,स्वप्नाली दांगट,श्वेताली कुलकर्णी, अनिता डुंबरे आदी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्र संचालन विनायक कुंडलिक यांनी केले, तर आभार प्रदर्शन किशोर काळदंते यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षकेतर कर्मचारी यांचे विशेष सहकार्य लाभले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांची मोलाचे सहकार्य लाभले.

# टाकळी ढोकेश्वर व परिसरात बैलपोळा उत्साहात साजरा; दुष्काळ व घटलेली संख्या चिंताजनक

पारनेर (समर्थ गांवकरी)

संपूर्ण महाराष्ट्रात शेतकरी राजाचा सण बैलपोळा टाकळी ढोकेश्वर व परिसरातील गावांमध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दुष्काळाचे सावट असतानाही बळीराजाने आपल्या बैलांना सजवून सण साजरा केला आणि पावसासाठी नवस-पूजा केली.

टाकळी ढोकेश्वर येथे संध्याकाळी परिसरातील शेतकऱ्यांनी आपले बैल रंगीबेरंगी कापड, घंटा, फुले व दागिन्यांनी सजवून गावात मिरवणुकीसाठी आणले. सजवलेले बैल पाहण्यासाठी गावकरी व परिसरातील नागरिकांची मोठी गर्दी जमली होती. बैलांची मिरवणूक, सनई ताफा पारंपरिक वाद्ये व शेतकऱ्यांचा उत्साह यामुळे गाव भरून गेले होते. यावेळी वासुंदे, कर्जुले हर्या, कान्हूर पठार, पारनेर, सुपा, भाळवणी या गावांमध्येही बैलपोळा उत्साहात साजरा झाला. शेतकऱ्यांनी बैलांचे पूजन करून पाऊस पडावा अशी प्रार्थना केली.

मात्र या उत्साहाच्या पार्श्वभूमीवर दुष्काळाचे सावट आणि बैलांची सतत घटत चाललेली संख्या चिंताजनक आहे. शेतकरी वर्गाने याबाबत शासनाने गांभीर्याने विचार करावा, अशी मागणी केली. आज राजरोसपणे होणारी बैलांची कत्तल आणि कत्तलखान्यांवर कठोर कारवाई व्हावी, अशी अपेक्षा बळीराजाने व्यक्त केली. पुढच्या पिढीला बैल फक्त फोटोत किंवा मूर्तीत दिसतील, ही भीती आता खऱ्या अर्थाने जाणवत आहे.



बैलांची घटलेली संख्या चिंताजनक महाराष्ट्रात बैलांची संख्या सातत्याने कमी होत आहे. दुष्काळ, चाराटंचाई, आर्थिक अडचणी आणि बेकायदेशीर कत्तल यामुळे शेतीला आधार देणारे बैल दुर्मीळ होत चालले आहेत. भविष्यकाळात बैल फक्त फोटो व मूर्तीत राहण्याची भीती व्यक्त होत आहे. शासनाने कत्तलखान्यांवर कठोर कारवाई, बैलपालन प्रोत्साहन योजना आणि संरक्षण धोरण तातडीने राबवावे, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.

# किनवट-माहूर तालुके दुष्काळग्रस्त घोषित करा

## अपुरा पाऊस व पिकांच्या नुकसानीमुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे निवेदन



किनवट (समर्थ गांवकरी)

किनवट व माहूर तालुक्यात यंदाच्या खरीप हंगामात पावसाचे प्रमाण अपुरे राहिल्याने पिकांची परिस्थिती गंभीर झाली असून, शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. त्यामुळे किनवट-माहूर विधानसभा क्षेत्रातील दोन्ही तालुके तत्काळ दुष्काळग्रस्त घोषित करून शेतकऱ्यांना आवश्यक मदत द्यावी, अशा आशयाचे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्या श्रीमती बेबीताई प्रदीप नाईक यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने शासनाकडे तहसीलदार किनवट यांच्या मार्फत निवेदनाव्दारे केली यावेळी निवेदन नायब तहसीलदार बालाजी फोले यांनी स्वीकारले. यासंदर्भात तहसीलदार, किनवट यांच्यामार्फत जिल्हा प्रशासनाकडे निवेदन देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले की, पावसाच्या दीर्घ खंडामुळे सोयाबीन, कापूस, तूर, मका, ज्वारी आदी खरीप पिकांवर मोठा परिणाम झाला असून उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांनी बियाणे, खते, औषधे, मशागत व मजुरीवर केलेला खर्च पिकांच्या नुकसानीमुळे वाया जाण्याची भीती निर्माण झाली आहे. शासनाने गावनिहाय व मंडळनिहाय पिकांची पाहणी करून तातडीने पंचनामे करावेत, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत व पीक विमा भरपाई मिळवून द्यावी, पीक कर्जाच्या वसुलीस स्थगिती देऊन कर्ज पुनर्गठन करावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. तसेच संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, जनावरांसाठी चारा, रोजगार हमीची कामे आणि शेतकऱ्यांना पुढील हंगामासाठी आवश्यक कृषी निविष्ठा उपलब्ध करून द्याव्यात, अशीही मागणी करण्यात आली आहे. शेतकऱ्यांची परिस्थिती आणखी गंभीर होण्यापूर्वी शासनाने तातडीने दुष्काळी उपाययोजना राबवून किनवट-माहूर विधानसभा क्षेत्रातील शेतकरी व ग्रामीण जनतेला दिलासा द्यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) च्या वतीने करण्यात आली. यावेळी निवेदनावर तालुका प्रमुख प्रकाश गब्बा राठोड यांच्या सह इतर पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे गरजेचे : जादूगार प्रकाश शिरोळे

## ढोकेश्वर विद्यालयात आनंददायी शनिवार निमित्त रंगले जादूचे प्रयोग

टाकळी ढोकेश्वर (समर्थ गांवकरी)

जादू म्हणजे कौशल्य, हातचलाखी व विज्ञान होय आणि भोंदूगिरी म्हणजे त्या कौशल्याचा किंवा अज्ञानाचा गैरवापर. जादूगार स्पष्टपणे मनोरंजनासाठी प्रयोग करतो आणि तो स्वतः ला देव किंवा चमत्कारी शक्तीचा मालक असल्याचे सांगत नाही.

मात्र भोंदू बाबा अशाच प्रकारच्या प्रयोगांना दैवी शक्ती, चमत्कार किंवा उपचार म्हणून सादर करून लोकांकडून पैसा, मान - सन्मान किंवा अनुयायी मिळवण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे समाजाने अशा भोंदू बाबांपासून दूर राहिले पाहिजे आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांना या जादूच्या प्रयोगमागील वैज्ञानिक दृष्टिकोन समजावला पाहिजे असे प्रतिपादन महाराष्ट्रातील प्रसिद्ध जादूगार प्रकाश शिरोळे यांनी केले.

पारनेर तालुक्यातील अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्था संचालित श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आनंददायी शनिवार निमित्त जादूचे प्रयोग आयोजित करण्यात आले होते.

त्या प्रसंगी प्रकाशजी शिरोळे यांनीजादूचे प्रयोग करता करता विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. इयत्ता ५ वी ते १२ वी च्या जवळपास १३०० विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचा आनंद घेतला. काही विद्यार्थी स्वतः या प्रयोगामध्ये सहभागी झाले. कार्यक्रम पाहून विद्यार्थी आनंदी झाले.

या प्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब खिलारी, पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे, शास्त्र समन्वयक अशोक गांगड, कला समन्वयक राजेंद्र ढोणे, भांडार प्रमुख प्रा. देविदास आठरे, परीक्षा प्रमुख बाबासाहेब जाधव, प्रसिद्ध चित्रपट गीतकार अरुण वाळुंज, रवींद्र मते, अतुल सैद, श्रीरंग धामणे, संदीप महांडुळे, नारायण शेळके, कल्पना जाधव, सुमन वाळुंज, प्रिया डव्हणे,सुरेखा ठाणगे, सोनल रोहकले, संदीप खिलारी, मिनाक्षी पवार, विष्णू भद्रे, निलेश पाचर्णे, सोनाली माळवदे, योगेश मांडगे, आतिष झावरे, सचिन महानवर, पोपट जगदाळे, सुनील झावरे, मिनाक्षी खाडे, सिमा खोसे, नितीन ढोकळे, मंगेश पोपळघट, रामदास नरवडे, सिमा खोसे, रुपाली घोलप, अनिकेत बांगर, सुवर्णा दिघे, पवन कुटे, शिरीष राऊत, अनुष्का कांबळे, भाऊसाहेब बांबेरे, नारायण हरेल, अमोल गोरे, सुनिता घोडके इत्यादी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अतुल सैद यांनी केले तर आभार पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे यांनी मानले.



**विशेष वसुली व विक्री अधिकारी मा.सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या मान्यतेने.**
**द्वारा माळशेज नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, ठाणे**
गाळा नं.१०२/१०३, अशोक सर्व्हिस इंडस्ट्रियल इस्टेट, जरीमरी मंदिरासमोर, एल.बी.एस.मार्ग, गोकुळनगर, नवनीत मोटार शेजारी, ठाणे(प.), पिन कोड-४००६०१
फोन नं.-०२२-६९३०९३५२

**स्थावर मालमत्ता ताबा नोटीस (नमुना झेड)**

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१(१) प्रमाणे माळशेज नागरी सहकारी पतसंस्था ठाणे, गाळा नं.१०२/१०३/११३/, अशोक इंडस्ट्रियल इस्टेट, जरीमरी मंदिरासमोर, एल.बी.एस.मार्ग, गोकुळनगर, नवनीत मोटार शेजारी, ठाणे(प.), पिन कोड-४००६०१ शाखा - माजिवाडा यांनी मा.सहायक निबंधक यांच्या आदेशान्वये खालील थकबाकीदार यांचेकडून त्यांचे असणारे कर्ज वसुलीकरिता लवादी दाखले प्राप्त केलेले आहेत.

त्याअर्थी, महाराष्ट्र राज्य संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ आणि १९६१ चा नियम १०७(११) (ड-१) (पहिली सुधारणा नियम २०१४ दि.३०/०८/२०१४ ची अधिसूचना) प्रमाणे सौ.सीमा मयुर कदम (विशेष वसुली व विक्री अधिकारी, ठाणे) यांचा आदेश जा.क्र.८३३ दि.०४/१२/२०२५ या दिवशी खालील थकबाकीदार यांच्या निम्नलिखित स्थावर मालमत्तेचा या नोटीशीन्वये मनाई करण्यात येत आहे.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

| कर्जदाराचे नाव/वसुली दाखला क्र. व दि. | मिळकतीचे वर्णन, क्षेत्रफळ व मिळकतीचे चतुःसीमा |
|---|---|
| कर्जदार :- श्री. सुभाष कचरू मनसुख जामिनदार:-१) श्री.चंद्रसेन राजाराम गमरे २) श्री.संतोष लक्ष्मण साळवी ३) श्री.हरिश्चंद्र तुळशीराम उघडे वसुली दाखला जा.क्र.उपनि/ ठा.श./ क.१०१ / व.दा./ मे. माळशेज सह.पत./ ५५८३/सन-२०२० दि. १३/०२/२०२० | (१) गट क्र.२१६, खाते क्र.११, क्षेत्र ०.०९.००, आकार ०.४९, तसेच फेरफार क्र.६४५, गाव - खिल्लारवाडी, तालुका - जुन्नर, जिल्हा - पुणे ४१२४०८ वरील **मिळकतीपैकी कर्जदार श्री.सुभाष कचरू मनसुख यांची वडिलोपार्जित/ स्वतःच्या मालकीची/ त्यांच्या हिश्यापुर्ती/ वाटणीस आलेली शेतजमीन** |

सदर मालमत्तेचा ताबा नोटीस दि.०४/१२/२०२५ रोजी माझ्या सही व कार्यालयीन मुद्रेसह दिला आहे.
दिनांक :- १२।०६।२०२६
**सौ.सीमा मयुर कदम**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**माळशेज नागरी सहकारी पतसंस्था मर्या. ठाणे**

**विशेष वसुली व विक्री अधिकारी मा.सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या मान्यतेने.**
**द्वारा माळशेज नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, ठाणे**
गाळा नं.१०२/१०३, अशोक सर्व्हिस इंडस्ट्रियल इस्टेट, जरीमरी मंदिरासमोर, एल.बी.एस.मार्ग, गोकुळनगर, नवनीत मोटार शेजारी, ठाणे(प.), पिन कोड-४००६०१
फोन नं.-०२२-६९३०९३५२

**स्थावर मालमत्ता ताबा नोटीस (नमुना झेड)**

ज्या अर्थी, महाराष्ट्र राज्य संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१(१) प्रमाणे माळशेज नागरी सहकारी पतसंस्था ठाणे, गाळा नं. १०२/१०३/११३, अशोक इंडस्ट्रियल इस्टेट, जरीमरी मंदिरासमोर, एल.बी.एस. मार्ग, नवनीत मोटार शेजारी, गोकुळनगर, ठाणे(प) ४००६०१ शाखा-डुंबरवाडी यांनी मा.उपनिबंधक/मा.सहायक निबंधक यांच्या आदेशान्वये खालील थकबाकीदार यांचेकडून त्यांचे असणारे कर्ज वसुलीकरिता लवादी दाखले प्राप्त केलेले आहेत.

त्याअर्थी, महाराष्ट्र राज्य संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ आणि १९६१ चा नियम १०७(११) (ड-१) (पहिली सुधारणा नियम २०१४ दि.३०/०८/२०१४ ची अधिसूचना) प्रमाणे सौ. सीमा मयुर कदम (विशेष वसुली व विक्री अधिकारी, ठाणे) यांचा आदेश जा.क्र. २४० दिनांक-०६/०८/२०२६ या दिवशी खालील थकबाकीदार यांच्या निम्नलिखित स्थावर मालमत्तेचा या नोटीशीन्वये ताबा घेतला आहे आणि या नोटीशीच्या तारखेनंतर सदर स्थावर मालमत्तेचा तबदील केल्यास, कोणतेही खाजगी हस्तांतरण, स्विकृत करणेस किंवा बोजा निर्माण करण्यास अथवा तारण देण्यास या नोटीशीन्वये मनाई करण्यात येत आहे.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

| कर्जदाराचे नाव/वसुली दाखला क्र. व दि. | मिळकतीचे वर्णन, क्षेत्रफळ व मिळकतीचे चतु:सीमा |
|---|---|
| कर्जदार- श्री. नंदकुमार सखाराम काळभोर<br>सहकर्जदार-सौ. सविता नंदकुमार काळभोर<br>जामिनदार-१) श्री. रंजन सतुभाऊ शेरकर २) श्री. युवराज महादेव येंधे<br>वसुली दाखला क्र. सह.नि./पुणे शहर/ नारायणगाव वि.का/३३३/२०१९ दि. २१/०८/२०१९ | ग्रां.पं.मि.नं-६४८, लांबी-२८ फुट बाय रुंदी ३० फुट = ७८.०४ चौ.मी. (८४० चौ.फुट), आ.सी.सी. पद्धतीचे घर वरती स्लॅब पूर्व मुखी<br>**कर्जदार श्री. नंदकुमार सखाराम काळभोर व सहकर्जदार सौ. सविता नंदकुमार काळभोर यांच्या स्व:मालकीचे घर** |

सदर मालमत्तेचा ताबा नोटीस दि.०६/०८/२०२६ रोजी माझ्या सही व कार्यालयीन मुद्रेसह दिला आहे.
दिनांक :- १२।०६।२०२६
**सौ.सीमा मयुर कदम**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**माळशेज नागरी सहकारी पतसंस्था मर्या. ठाणे**

**विशेष वसुली व विक्री अधिकारी मा.सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या मान्यतेने.**
**द्वारा माळशेज नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, ठाणे**
गाळा नं.१०२/१०३, अशोक सर्व्हिस इंडस्ट्रियल इस्टेट, जरीमरी मंदिरासमोर, एल.बी.एस.मार्ग, गोकुळनगर, नवनीत मोटार शेजारी, ठाणे(प.), पिन कोड-४००६०१
फोन नं.-०२२-६९३०९३५२

**स्थावर मालमत्ता ताबा नोटीस (नमुना झेड)**

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१(१) प्रमाणे माळशेज नागरी सहकारी पतसंस्था ठाणे, गाळा नं.१०२/१०३/११३/, अशोक इंडस्ट्रियल इस्टेट, जरीमरी मंदिरासमोर,एल. बी.एस.मार्ग, गोकुळनगर, नवनीत मोटार शेजारी, ठाणे(प.), पिन कोड-४००६०१ शाखा - कोपरखैरणे यांनी मा.सहायक निबंधक यांच्या आदेशान्वये खालील थकबाकीदार यांचेकडून त्यांचे असणारे कर्ज वसुलीकरिता लवादी दाखले प्राप्त केलेले आहेत.

त्याअर्थी, महाराष्ट्र राज्य संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ आणि १९६१ चा नियम १०७(११) (ड-१) (पहिली सुधारणा नियम २०१४ दि.३०/०८/२०१४ ची अधिसूचना) प्रमाणे सौ.सीमा मयुर कदम (विशेष वसुली व विक्री अधिकारी, ठाणे) यांचा आदेश जा.क्र.१२५ दि.०६/०६/२०२६ या दिवशी खालील थकबाकीदार यांच्या निम्नलिखित स्थावर मालमतेचा या नोटीशीन्वये मनाई करण्यात येत आहे.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

| कर्जदाराचे नाव /वसुली दाखला क्र. व दि. | मिळकतीचे वर्णन, क्षेत्रफळ व मिळकतीचे चतुःसीमा |
|---|---|
| कर्जदार - श्री. चंद्रकांत निवृत्ती नरवडे<br>जामिनदार:- १) श्री.दत्तात्रय गेनभाऊ दाते २) श्री. हनुमंता आनंदा माने<br>वसुली दाखला दावा क्र.५३५/ २०२(पत) जा.क्र. उपनि/ठा.श./ बी-६/क.१०१/ ५७०/सन- २०११ दि.२१/ ०४/ २०११ | **गट क्र.१८३/५ -** (१) खाते क्र.३८१, क्षेत्र ०.१५.००, आकार ०.३४, तसेच फेरफार क्र.२२५३१, **गट क्र.१८४/४ -** (१) खाते क्र.३८१, क्षेत्र ०.१४.५०, आकार ०.४८, तसेच फेरफार क्र.२१९०६, (२) खाते क्र.३८२, क्षेत्र०.१४.५०, आकार ०.४८, तसेच फेरफार क्र.२३०८४, **गट क्र.१८५/७ -** (१) खाते क्र.३८१, क्षेत्र ०.५४.५०, आकार ०.०९, तसेच फेरफार क्र.२३०८८, (२) खाते क्र.३८२, क्षेत्र ०.१८.५०, आकार ०.०३, तसेच फेरफार क्र.२३०८८, **गट क्र.१९६/३ -** (१) खाते क्र.३८१, क्षेत्र ०.३०.००, आकार ०.९०, तसेच फेरफार क्र.२२५३१, **गट क्र.२०४/६ -** (१) खाते क्र.३८१, क्षेत्र ०.०३.५०, आकार ०.२५, तसेच फेरफार क्र.२२५३१, (२) खाते क्र.३८२, क्षेत्र ०.०३.५०, आकार ०.२५, तसेच फेरफार क्र.२३०८४, **मु.पो.चाळकवाडी, ता.जुन्नर, जि.पुणे ४१५६१२ वरील मिळकतीपैकी कर्जदार- श्री.चंद्रकांत निवृत्ती नरवडे यांचे वडील श्री.निवृत्ती गणपत नरवडे यांच्या स्वतःच्या मालकीची त्यांच्या हिश्यापुर्ती/वाटणीस आलेली शेतजमिन** |

सदर मालमत्तेचा ताबा नोटीस दि.०६/०६/२०२६ रोजी माझ्या सही व कार्यालयीन मुद्रेसह दिला आहे.
दिनांक :- १२।०६।२०२६
**सौ.सीमा मयुर कदम**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**माळशेज नागरी सहकारी पतसंस्था मर्या. ठाणे**

## थोडक्यात पण महत्वाचे

### 'कळी उमलताना' उपक्रम उत्साहात संपन्न




जुन्नर (समर्थ गांवकरी)

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प घोडेगाव व डिसेंट फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने शासकीय माध्यमिक आश्रम शाळा सोनवळे येथे किशोरवयीन मुलींसाठी 'कळी उमलताना' या आरोग्य व व्यक्तिमत्त्व विकास मार्गदर्शन उपक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात डिसेंट फाउंडेशनचे सचिव डॉ.एफ. बी.आतार यांनी मुलींना मानसिक आरोग्याबाबत मार्गदर्शन केले.सुदृढ आरोग्या सोबतच स्वावलंबी विचार व आत्मविश्वासपूर्ण व्यक्तिमत्त्व हीच उज्वल भविष्याची गुरुकिल्ली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले तर उज्वला गवळी यांनी मुलींचे शारीरिक आरोग्य मासिक पाळीदरम्यानघ्यायची वैयक्तिक स्वच्छता व काळजी तसेच स्वसंरक्षणाचे महत्त्व या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. या प्रसंगी उपस्थित सर्व विद्यार्थिनींना मोफत पर्यावरण पूरक सॅनिटरी नॅपकिन तसेच 'कळी उमलताना'या मार्गदर्शन पुस्तिकेचे वाटप करण्यात आले.या कार्यक्रमास छाया पाटील,शीतल पवार,गृहप्रमुख अधिक्षिका अंकिता राजपूत, समन्वयक योगेश वाघचौरे, श्रावण घोगरे यांच्यासहआश्रम शाळेतील शिक्षिका व मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या. 'सशक्त मुलगी – सुदृढ समाजाची पायाभरणी' हा संदेश देणारा हा उपक्रम मुलींसाठी अत्यंत उपयुक्त ठरला.

### देवठाण शाळेत चिमुकल्यांनी साकारल्या पर्यावरणपूरक गणेशमूर्ती !



अकोले(समर्थ गांवकरी)

जिल्हा परिषदेच्या देवठाण शाळेत आज 'आनंददायी शनिवार' उपक्रमांतर्गत चिमुकल्यांनी शाडूची माती तसेच चिकण मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनवल्या. माती चाळून, चिखल मळून त्यापासून गणेशमूर्ती बनवण्यात चिमुकले हात तब्बल दोन–अडीच तास रमून गेले होते. शाळेतल्या चिमुकल्या मुलांनी साकारलेल्या या गणेश मूर्तींची मंडळाच्या गणेशमूर्तींशेजारी तसेच घरच्या गणेशमूर्ती शेजारी स्थापना करणार असल्याचा मनोदय विद्यार्थ्यांनी बोलून दाखवला...

विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी देवठाण शाळेत विविध उपक्रम व क्षेत्रभेटी आयोजित केल्या जातात. आज 'आनंददायी शनिवार' या उपक्रमांतर्गत संगीत कवायत झाल्यानंतर शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी गणेशमूर्ती बनवल्या. चिकण माती तयार करण्यासाठी मुलांनी चाळण्या आणल्या होत्या. चाळणीने माती चाळून, शिक्षकांच्या मदतीने एकजीव चिकण मातीचा गोळा तयार करून त्यापासून विद्यार्थ्यांनी आपल्या आपल्या कल्पकतेनुसार गणेशमूर्ती साकारल्या. काही मुलांनी शाडूच्या मातीपासून गणेशमूर्ती तयार केल्या. मूर्ती तयार करण्यात मुलं मनापासून रममाण झाली होती. त्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. आपल्या हाताने साकारलेली गणेशमूर्ती पाहताना मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि समाधान अनुभवण्यासारखे होते.

### सचिवांशी गैरवर्तनाच्या निषेधार्थ एमपीएससी अधिकारी-कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन

मुंबई (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सचिव महेंद्र हरपाळकर यांच्याशी ११ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या गैरवर्तनाच्या निषेधार्थ आयोगातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तीव्र निषेध व्यक्त करत काम बंद आंदोलनाचा निर्णय घेतला आहे. आयोगातील अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेची शासनाकडून ठोस, स्पष्ट आणि प्रभावी हमी मिळेपर्यंत हे आंदोलन सुरू ठेवण्याची भूमिका त्यांनी मांडली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोग ही संविधानिक संस्था असून सचिव हे आयोगाचे प्रशासकीय प्रमुख आहेत. त्यामुळे प्रशासकीय प्रमुखांशी झालेल्या गैरवर्तनाची घटना ही गंभीर असून, संबंधित व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी अधिकारी–कर्मचाऱ्यांनी केली आहे. तसेच आयोगातील अधिकारी–कर्मचाऱ्यांना धमकीवजा वक्तव्ये करण्यात आल्याने त्यांच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, आयोगाच्या एका परीक्षेतील पेपरफुटी आणि गैरप्रकारामुळे उमेदवारांमध्ये संताप, अस्वस्थता आणि अविश्वास निर्माण झाल्याची भावना अधिकारी–कर्मचाऱ्यांनी समजून घेतली आहे. परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकता आणि उमेदवारांच्या भवितव्याशी संबंधित त्यांच्या अपेक्षांचा आदर असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

# नेवासा येथील महानुभाव आश्रमात सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींचा अवतार दिन विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरा

नेवासा (समर्थ गांवकरी)

नेवासा येथील प्रवरानदीच्या तिरावर असलेल्या श्रीचक्रधरस्वामी महास्थान व महानुभाव आश्रमामध्ये सर्वज्ञ श्रीचक्रधरस्वामी यांचा ८०६ वा अवतार दिन शनिवारी दि.१२ सप्टेंबर रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांनी भक्तिमय वातावरणात ध्वजारोहण करून साजरा करण्यात आला.यावेळी उपस्थित साधू संतांच्या उपस्थितीत येथे असलेल्या चक्रधर स्वामींच्या महास्थानाचे पूजन करण्यात आले.

यावेळीझालेल्या सर्वज्ञ चक्रधर स्वामींच्या येथील महास्थानाचे पूजन त्रिवेणीश्वर देवस्थानचे महंत श्री रमेशानंदगिरी महाराज,मध्यमेश्वर मंदिराचे प्रमुख महंत बालयोगी श्री ऋषिनाथजी महाराज, पिचडगाव येथील माऊली आश्रमाचे प्रमुख महंत हभप ज्ञानेश्वर महाराज हजारे,संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे अध्यक्ष पांडुरंग अभंग,अंकुश महाराज जगताप,महानुभाव आश्रमाचे प्रमुख महात्मा शाममुनीजी महाराज अंकुळनेरकर, उत्तराधिकारी धनंजयमुनी महाराज,नेवासा नगरीचे नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले, शिवसहकार सेनेचे राज्य उपप्रमुख बालेंद्र पोतदार, नगरसेवक स्वप्नील मापारी,दिनेश व्यवहारे,योगेश रासने अनिल ताके यांच्या हस्ते करण्यात आले.

सर्वज्ञ चक्रधर स्वामींच्या अवतार दिनानिमित्त शनिवारी पहाटे ५ ते ५.३० या वेळेत श्रीचक्रधर स्वामींच्या महास्थानासह मूर्तीस मंगल स्नान घालून आरती करण्यात आली. सकाळी ६.३० वाजता श्रीमद भगवत गीता पारायण भक्तिमय वातावरणात पार पडले.त्यानंतर

अंमळनेर–करजगाव येथील प्रा.महेश कुलकर्णी यांचे सर्वज्ञ चक्रधर स्वामींच्या जीवनकार्यावर प्रवचन झाले.

सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींचे देशातील एकमेव महास्थानतीर्थक्षेत्र नेवासा येथे असल्याने येथील परिसराच्या विकासासाठी नक्कीच शासन दरबारी पाठपुरावा करण्यासाठी आपण प्रयत्न करू अशी ग्वाही नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले पाटील यांनी यावेळी बोलताना दिली.



यावेळी सुधाकरदादा येळमकर, प्रभाकरदादा धाराशिवकर,मयंकराज अंकुळनेरकर, बलदेवराज येळमकर,काकासाहेब खराडे,सौदामिनी ग्रुपच्या सौ.अमृताताई नळकांडे,भार्गवी मापारी,भेंडा येथील काळे सर,भैरवनाथ भारस्कर,बाळासाहेब कराळे,आबासाहेब घोडेचोर,महिला सेवेकरी मंगलताई फुलसौंदर,विशाखा नाईक,ज्योतीताई काळे,आरतीताई भणगे यांच्यासह काळे परिवार व फुलसौंदर परिवारातील सदस्य सेवेकरी, महानुभाव पंथातील सर्व महाराज मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित हजारो भाविकांना प्रसादाचे वाटप यावेळी करण्यात आले.चक्रधरस्वामींच्या अवतार दिनानिमित्त येथे असलेल्या महास्थानावर दर्शनासाठी गर्दीचा ओघ दिवसभर सुरूच होता.

# बुद्धिबळ स्पर्धेत महादजी शिंदे विद्यालयाची गरुड झेप

## रयत शिक्षण संस्थेच्या श्रीगोंदा येथील संकुलातील महादजी शिंदे विविध क्रीडा स्पर्धांमध्ये गरुड झेप

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

जिल्हा क्रीडा कार्यालय व श्रीगोंदा तालुका क्रीडा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे या विविध क्रीडा स्पर्धांमध्ये शालेय स्पर्धांमध्ये महादजी शिंदे विद्यालयाच्या बुद्धिबळ खेळाडूंनी सर्वोच्च कामगिरी करत विजेतेपद पटकावले.

बुद्धिबळ स्पर्धेमध्ये

१४ वर्षे वयोगट– प्रथम क्रमांक: दळवी वेदांत राहुल, द्रितीय क्रमांक: पोटे आदित्य सतिश, चौथा क्रमांक: श्लोक संदिप कुलकर्णी

१७ वर्षे वयोगट– प्रथम क्रमांक : सार्थक सुनील दरेकर, उत्तेजनार्थ क्रमांक: भूषण राजेंद्र पवार



१७ वर्षे वयोगट मुली – प्रथम क्रमांक : क्रतू कैलास माने

सर्वच सामने अत्यंत चुरशीचे झाले व चुरशीच्या सामन्यांमध्ये महादजी शिंदे विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी दाखवत विजेतेपद पटकावले.

खेळाडूंना बुध्दीबळ प्रशिक्षक हर्षवर्धन आगळे, संदिप बिरंगळ , क्रीडा विभाग प्रमुख म्हणून सचिन झगडे यांनी कामगिरी पार पाडली.

विजेत्यांचे मुख्याध्यापक दिलीप भुजबळ, उपमुख्याध्यापक शहाजी एकाड, पर्यवेक्षिका सुनिता काकडे, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेब भोस ,माजी मंत्री तथा जनरल बॉडी सदस्य बबनरावजी पाचपुते स्थानिक स्कूल कमिटीचे रवीशेठ दंडनाईक, मनोहर पोटे, सल्लागार समितीचे सुधीर खेडकर आदी मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# मांडवा-घोगरवाडी रस्त्याच्या रुंदीवरून ग्रामस्थांचा आक्षे

किनवट (समर्थ गांवकरी)

मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत मौजे मांडवा ते घोगरवाडी रस्त्याचे काम सुरू असून, या कामासाठी ६० फुट रुंदीची जागा उपलब्ध करून देण्याच्या मागणीवरून संबंधित जमीनमालक व ग्रामस्थांनी आक्षेप नोंदविला आहे. यासंदर्भात पंचायत समिती किनवट येथे येथे ११ सप्टेंबर २०२६ रोजी लेखी निवेदन देण्यात आले. तर ग्रामपंचायत मांडवा (कि.) येथे निवेदन स्विकारण्यास कोणतेही कर्मचारी उपस्थित नव्हते.

निवेदनानुसार, सर्व्हे क्र. १७४ मधील केशवराव नारायण गिते व इतरांनी गावाच्या सार्वजनिक वापरासाठी पूर्वीच सुमारे ३० फुट रुंदीचा रस्ता/जागा उपलब्ध करून दिली आहे. या रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या जमिनींचे व्यवहार यापूर्वी झाले असून ग्रामपंचायत अभिलेखात त्यासंबंधी नोंदी असल्याचा दावा ग्रामस्थांनी निवेदनात केला आहे. तसेच रस्त्यालगत विविध बांधकामे अस्तित्वात असल्याचेही निवेदनात नमूद आहे.

अशा परिस्थितीत सध्या ६० फुट रुंदीची अतिरिक्त जागा ग्रामसेवक व सरपंचाकडुन मागणी करण्यात येणे अन्यायकारक असल्याचे सांगून, पूर्वीपासून सार्वजनिक वापरात असलेल्या ३० फुट रुंदीच्या रस्त्यावरच संबधित योजनेचे काम करण्यात यावे, अशी मागणी निवेदनाव्दारे करण्यात आली आहे. शासनाच्या तांत्रिक निकषांनुसार ६० फुट रुंदी आवश्यक असल्यास संबंधितांची जमीन विना मोबदला घेऊ नये, तर कायदेशीर संपादन प्रक्रिया राबवून जमीनमालकांना नियमानुसार योग्य मोबदला द्यावा, अशी मागणीही करण्यात आली आहे. दरम्यान, उपलब्ध प्रकल्प कागदपत्रांनुसार सदर रस्ता मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतील Package No. NDD--083 अंतर्गत MDR-07 ते Ghogarwadi MRL-18 असा असून त्याची प्रस्तावित लांबी ४.०६० कि.मी. आणि ormation width 7.50 मीटर नमूद आहे. प्रकल्पाची अंदाजित किंमत सुमारे ५१४.११ लाख (५.१४ कोटी) आहे. या कागदपत्रात No additional land required अशी नोंद असल्याने प्रत्यक्षात अतिरिक्त ६० फुट जागेची मागणी कोणत्या मंजूर आराखड्यानुसार करण्यात येत आहे, याबाबतही ग्रामस्थांनी स्पष्टता मागितली आहे.

# सर्व सुरक्षितेचे तंतोतंत पालन करून BDDS ची प्रात्यक्षिक सादर



जुन्नर (समर्थ गांवकरी)

शंकरराव बुट्टे पाटील महाविद्यालयात जुन्नर येथे जुन्नर पोलीस स्टेशन पथक,बॉम्बशोधक व नाशक पथक (BDDS),पुणे ग्रामीण दहशतवादी विरोधी पथक जलद प्रतिसाद पथक (क्यू आर टी)यांचे संयुक्त प्रात्यक्षिक सादर करण्यात आले सदर प्रात्यक्षिकामध्ये बॉम्बशोधक व नाशिक पथकातील पोलीस पीएस आय ओव्हाळ पोलीस हवालदार सतीश गेंगजे, संदीप जगताप,गणेश फापाळे संभाजी पाटील सुधीर घोरपडे यश कठाले,श्वान वीरा तसेच दहशतवादी विरोधी पथकाचे महेश गायकवाड व क्यू आर टी चे पोलीस शिपाई भोर पोलीस शिपाई जावळे यांनी सहभाग घेऊन विद्यालयात सर्व सुरक्षितेचे तंतोतंत पालन करून प्रात्यक्षिक सादर केले सदर प्रात्यक्षिके हे शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे व आपत्कालीन परिस्थितीमध्ये वरील पोलिस यंत्रणा कशा पद्धतीने कार्य वाही करते याचे मार्गदर्शन मगद्वारे मॉक ड्रिल द्वारे त्यांना दाखवण्यात आले.

यावेळी जुन्नर पोलीस स्टेशनचे गुंड,जुन्नर एज्युकेशन सोसायटीचे शंकरराव बुट्टे पाटील विद्यालयाचे संस्थेचे कार्याध्यक् राहुल जोशी, सेक्रेटर एडवोकेट अविनाश थोरवे,संस्थेचे सभासद ओंकार जोशी सर्व शिक्षक सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# ऋतुजा कुरुमकर हिचा राजेंद्र नागवडेंकडून कारखाना कार्यस्थळावर सन्मान

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

मुंढेकरवाडी तालुका श्रीगोंदा येथील शेतकरी कुटुंबातील कन्या ऋतुजा बापूराव कुरुमकर हिने जिद्दीच्या जोरावर व सतत मन लावून अभ्यासात लक्ष केंद्रित करून स्पर्धा परीक्षा व एमपीएससी परीक्षेच्या माध्यमातून उत्तीर्ण होत ग्रामपंचायत अधिकारी पद मिळवले. व उतुंग यश प्राप्त केले. या प्रित्यर्थ सहकार महर्षी नागवडे कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र दादा नागवडे यांनी कारखाना कार्यस्थळावर यथोचित सन्मान करून ऋतुजाला पुढील कार्यास भरभरून शुभेच्छा व्यक्त केल्या यावेळी नागवडे कारखान्याचे माजी व्हाईस चेअरमन व विद्यमान संचालक सुभाष काका शिंदे, संचालक विठ्ठलराव जंगले, ड. अशोकराव रोडे, आप्पासाहेब कुरुमकर, ऋतुजा कुरुमकरचे वडील बापूराव कुरुमकर, सुनील जंगले नंदकुमार कुरुमकर, दादा कुरुमकर, प्रकाश उंडे, नंदू मुंढेकर, पप्पू ठोमसकर. आदी यावेळी उपस्थित होते. शुभेच्छा पर भाषणात नागवडे कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे म्हणाले की अलीकडे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण घेत असताना मुलींची अभ्यासात व गुणात्मक बाबीत प्रगती अग्रेसर दिसून येते वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवत मुलींनी प्रत्येक क्षेत्रात भरारी घेतली आहे ऋतुजा कुरुमकर हिने देखील जिद्दीने आपला स्पर्धा परीक्षा व एमपीएससी परीक्षेचा अभ्यास केला शासकीय नोकरी मिळवली. अकोले तालुक्यात कोहने गावातील दुर्गम भागात नोकरीची जबाबदारी मिळाली ती सक्षमपणे पार पाडेल. व यापुढेही नोकरी करत असताना ऋतुजाने आणखी ज्ञान



मिळून मोठ्या पदापर्यंत ध्येय घाटावे असे सांगून श्री नागवडे यांनी ऋतुजाला पुढील कार्यास शुभेच्छा व्यक्त केल्या.

याप्रसंगी नागवडे कारखान्याचे संचालक सुभाष काका शिंदे व ड. अशोकराव रोडे यांनीही मनोगत व्यक्त करत ऋतुजा कुरुमकर हिला शुभेच्छा व्यक्त केल्या.

यावेळी सत्काराला उत्तर देताना ऋतुजा कुरुमकर पुढे म्हणाली की, मी स्पर्धा परीक्षा व एमपीएससी परीक्षा देत असताना मागे वळून पाहिले नाही. मनाशी जिद्द ठेवली. आई–वडिलांनी देखील मोठे पाठबळ दिले. म्हणूनच मी हे यश संपादन करू शकले. नागवडे कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र दादा नागवडे यांनी माझ्या यशाचे यश कौतुक केले, आशीर्वाद दिले, निश्चितपणे हे आशीर्वाद माझ्या पुढील वाटचालीस प्रेरणादायी ठरतील असे ऋतुजा कुरुमकर हिने सांगत माझा सन्मान केल्याबद्दल नागवडे कारखाना प्रशासनाचे आभार मानले. सूत्रसंचालन ह भ प भाऊसाहेब बांदल यांनी केले.

# डिंभा बोगद्याला स्थगिती नाही, पारनेर तालुक्यातील जनतेचा पन्नास वर्षाचा पाणी प्रश्न सोडवीणार : मा.खा. डॉ. सुजय विखे पाटील

पारनेर (समर्थ गांवकरी)

डिंभा बोगद्याचे काम होणार असून कोनत्याही प्रकारची स्थगिती आलेली नाही. नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी घेतलेले काम ते पुर्ण केल्याशिवाय राहात नाहीत हा पुर्वईतिहास आहे. पारनेर तालुक्यातील जनतेचा पन्नास वर्षाचा पाणी प्रश्न सोडवीणार असल्याची ग्वाही माजी खासदार डॉ सुजय विखे पाटील यांनी दिली आहे. संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशन व निघोज ग्रामस्थ आयोजित दहीहंडीचा कार्यक्रम शुक्रवार दि.११ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला यावेळी दहीहंडी कार्यक्रम पाहण्यासाठी किमान पाच हजार पेक्षा निघोज आणी पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सायंकाळी ७ वाजता शबनम पुणेकर यांचा नाचगाण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. माजी खासदार डॉ सुजय विखे पाटील यांचे ८. ३० वाजता निघोज येथे आगमन झाले. त्यांनी सर्वप्रथम राज्यातील जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीचे दर्शन घेतले. त्यानंतर कार्यकर्त्यांनी त्यांना मिरवणुकीने कार्यक्रम स्थळी आणले या वेळी त्यांच्या समवेत आमदार काशिनाथ दाते. राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, जिल्हा उपाध्यक्ष रखमाजी कापसे, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ, भाजपचे नेते राहुल शिंदे, भाजपचे युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष पंकज कारखिले, माजी पंचायत समिती सदस्य दिनेश बाबर, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भास्करराव उचाळे, उपसरपंच ज्ञानेश्वर उर्फ माऊली वरखडे, व्यापारी असोसिएशन अध्यक्ष बबनराव तनपुरे आदी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सायंकाळी ७ वाजता सुरू झालेला हा कार्यक्रम रात्री ११ वाजता रामराज्य गोविंदा पथक ओतूर यांनी दहीहंडी फोडल्यानंतर या कार्यक्रमाची सांगता झाली. दहीहंडीसाठी ५ लाख ५५ हजार रुपयांचे बक्षीस ठेवण्यात आले होते. माजी खासदार डॉ सुजय विखे पाटील यावेळी म्हणाले पुर्वीपासून पारनेर हा दुष्काळी तालुका आहे. मात्र पन्नास वर्षाचे पाण्याचे नियोजन करुन तालुक्याचा पाण्याचा प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी आम्ही प्रयत्नरत आहोत. राज्याचे जलसंपदामंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी डिंभा बोगद्याचे काम पुर्ण करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली कामाचा पाठपुरावा केला हे काम पुर्ण होणार आहे. स्थगिती आली आहे या निव्वळ वावड्या आहेत त्यावर कुणीही विश्वास ठेऊ नये माजी खासदार बाळासाहेब विखे पाटील यांनी हयातभर पाण्यासाठी भांडले पाण्याचे नियोजन करताना त्यांनी जिल्ह्यातील अनेक तालुक्यांत पाण्याच्या कायमस्वरूपी योजना राबविल्या, पारनेर तालुका दुष्काळमुक्त करु हे त्यांचे स्वप्न होते. राधाकृष्ण विखे पाटील यांनी डिंभे बोगद्यासाठी पाठपुरावा केला. सर्व नेतेमंडळींनी पाठबळ दिल्याने या १६ किलोमीटर बोगद्याचे काम लवकरच सुरू होणार आहे. पारनेरसहीत जिल्ह्यातील दक्षिण भागाचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटणार आहे. अ

म्हाला आमचे समान पाणी द्या हीच मागणी आहे ती मागणी या बोगद्याच्या माध्यमातून पुर्ण होणार आहे. आमदार काशिनाथ दाते हे कार्यक्षम नेतृत्व असून गेली दोन वर्षात मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली आहेत. विकासकामांच्या माध्यमातून आम्ही जनतेत असून जनता हेच आमचे दैवत असल्याचे विखे पाटील




यांनी सांगितले. आमदार काशिनाथ दाते यांनी यावेळी संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ व त्यांच्या सहकाऱ्यांचे कौतुक केले. दहीहंडी माध्यमातून या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी झाली आहे. निघोज अळकुटी जिल्हा परिषद गटातील एक कार्यक्षम युवा नेतृत्व म्हणून त्यांना मोठी संधी असून तालुक्यातील विकासकामांसाठी राज्याचे जलसंपदामंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व माजी खासदार डॉ सुजय विखे पाटील यांचे योगदान सर्वाधिक असल्याचे त्यांनी सांगितले. संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ यांनी या वेळी प्रास्ताविक भाषणात सांगितले की डॉ. सुजय दादांचे निघोजवर अतिशय प्रेम आहे. हातावर शस्त्रक्रिया झाली असताना सुद्धा ते या ठिकाणी आले असून बोगद्याचे काम होणार आहे हे सांगून त्यांनी पारनेर तालुक्यातील जनतेला दुष्काळमुक्तीचे आश्वासन दिले आहे. राज्याचे जलसंपदामंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील,माजी खासदार डॉ सुजय विखे पाटील व आमदार काशिनाथ दाते सर यांच्यामुळे गेली अनेक वर्षात तालुक्यात मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली असल्याचे त्यांनी सांगितले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपसरपंच ज्ञानेश्वर उर्फ माऊली वरखडे यांनी केले. युवा नेते अर्जुन लामखडे यांनी आभार मानले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ–१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### वांजुळशेत येथे पारंपारिक पध्दतीने पोळा साजरा



राजुर (समर्थ गांवकरी)

वांजुळशेत ता.अकोले येथे जुनी पारंपारीक वाद्य वाजवत बैल पोळा सण उत्साहात साजरा करण्यात आला. नवनवीन तंत्र युगात अनेक नवनवीन वाद्य विवीध कार्यक्रमात वाजविण्याचा बडेजाव केल्याचे बघायला मिळतो. परंतु डीजे सारख्या वाद्यांना अधिकचे पैसे दिले जातात. त्यामुळे ध्वनी प्रदुषणही मोठ्या प्रमाणात होत असते.तसेच आसपासच्या नागरिकांना आवाजाचा मोठा त्रास सहन करावा लागतो. तसेच अशा वाद्यामुळे पारंपारीक वाद्य लोप पावत चाललेली आहेत परंतु वांजुळशेत ग्रामस्थांनी या गोष्टीला फाटा देत पारंपारीक वाद्यांच्या आवाजात पोळा सण साजरा केला यामध्ये स्थानिक कलाकारांनाही चालना मिळते. संबळाच्या तालासुरात ग्रामस्थ या उत्सवात सहभागी झाले होते तांबेकरवाडीतील ग्रामस्थांनी शांतामाई मंदिरापासुन मिरवणुकीला सुरूवात केली तर कांदडवाडी,गावठा ग्रामस्थांनी मारूती मंदिरापासुन सुरूवात केली नंतर सर्व ग्रामस्थ मुक्ताई मंदिर व मोठादेवाजवळ जमुन देवाचे दर्शन घेतात. त्यानंतर शेतकरी आपापल्या घरी बैल घेऊन जातात.

### कनका भवन मालकाच्या आत्महत्या प्रकरणाने भोकर हादरले!

भोकर (समर्थ गांवकरी)

भोकर तहसील कार्यालयासमोर असलेल्या कनका भवनचे मालक वेंकटेश सायगौड भुरेवार (५३) यांनी ४ सप्टेंबर रोजी नांदेड येथील गोवर्धन घाटावर गोदावरी नदीत उडी घेऊन आत्महत्या केल्याच्या घटनेने भोकर शहर हादरले आहे. या प्रकरणी त्यांच्या आईने भोकर पोलिस ठाण्यात तक्रार देत काही व्यक्तींवर गंभीर आरोप केले आहेत. मात्र, तक्रार दाखल होऊनही अद्याप गुन्हा नोंदविण्यात आलेला नसल्याने पोलिस तपासाच्या भूमिकेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.



मृताच्या आई सत्यक्का सायगौड भुरेवार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, कनका भवनची इमारत व संबंधित जमीन अनेक वर्षांपासून त्यांच्या कुटुंबाच्या ताब्यात आहे. सदर मालमत्ता नगर परिषद प्रपत्र क्रमांक ४३ मध्ये नोंद असून, त्यांच्याकडे पीआर कार्ड असल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे.

जमीन विक्रीसाठी दबावाचा आरोप

तक्रारीत मोहम्मद हारून मोहम्मद युसूफ, रमीजुद्दीन तकीउद्दीन इनामदार, शिजूखान सदातखान, अहमदखान अल्लारखान इनामदार आणि अजबाज खान फतेहखान भुरेवार यांच्यावर जमीन व इमारत रिकामी करण्यासाठी तसेच ती विक्री करण्यासाठी दबाव आणल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित जमीन इनामाची असल्याचा दावा करून मानसिक त्रास व धमक्या दिल्याचेही तक्रारीत नमूद आहे.

सुमारे तीन कोटी रुपये किंमत असल्याचे सांगितल्या जाणाऱ्या जमिनीचा कथित दबावाखाली एक कोटी दहा लाख रुपयांत व्यवहार करण्यात आल्याचा गंभीर दावा मृताच्या आईने केला आहे. या व्यवहारामुळे वेंकटेश भुरेवार मानसिक तणावाखाली होते आणि त्यांना सातत्याने धमक्या दिल्या जात असल्याचेही तक्रारीत म्हटले आहे.

### परीक्षा प्रक्रियेत स्थैर्य, सुरक्षितता आणि पारदर्शकतेला प्राधान्य

पुणे (समर्थ गांवकरी)



महाराष्ट्र लोकसेवा आयोगासह विविध स्पर्धा परीक्षांची प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुरक्षित, स्थिर आणि उमेदवाराभिमुख करण्यासाठी राज्य शासनाने स्थापन केलेल्या उच्चस्तरीय भरती परीक्षा टास्क फोर्सच्या वतीने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे विद्यार्थ्यांसह शिक्षक, पालक आणि अन्य संबंधितांशी सल्लामसलत करण्यात आली. परीक्षा वेळापत्रक, प्रश्नपत्रिकेची गुणवत्ता, प्रश्नपत्रिका गळतीला प्रतिबंध, पदसंख्या, उत्तरतालिका, परीक्षा केंद्रे, तक्रार निवारण आणि 'ऑप्टिंग आऊट' याबाबत विविध सूचना मांडण्यात आल्या. सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव (सेवा) व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखाली भरती परीक्षा टास्क फोर्स समिती कार्यरत आहे. समितीत पोलीस महासंचालक सदानंद दाते, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी, नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, संघ लोकसेवा आयोगाचे माजी सदस्य एअर मार्शल अजित शंकरराव भोसले (सेवानिवृत्त) आणि आयआयटी मुंबईचे प्राध्यापक श्यामप्रसाद करगड्डे यांचा समावेश आहे. टास्क फोर्सकडे आतापर्यंत राज्यभरातून १८ हजारांहून अधिक ई-मेल्स प्राप्त झाले आहेत.

# मा. सचिनराव लगड सरांचा श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात भावुक वातावरणात गौरव

## 'आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार' प्राप्त झाल्याबद्दल श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या वतीने भव्य सत्कार

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

शिक्षण क्षेत्रातील निष्ठावंत सेवा, उत्कृष्ट प्रशासकीय कौशल्य आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने राबवलेले उपक्रम याची दखल घेत, श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे इन्स्पेक्टर तथा यशवंतराव चव्हाण विद्यालयाचे मुख्याध्यापक मा. श्री. सचिनराव लगड सर यांना जिल्हा परिषद अहिल्यानगर आणि मुख्याध्यापक संघाच्या संयुक्त विद्यमाने 'आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. या विशेष यशाबद्दल श्रीगोंदा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.

या प्रसंगी श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. राजेंद्रदादा नागवडे, नागवडे सहकारी साखर कारखान्याच्या संचालिका मा. सौ. अनुराधावहिनी नागवडे यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाने आयोजित या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी, संस्थेचे विश्वस्त प्रा. सुरेश रसाळ, उपप्राचार्य प्रा. सी. आर. कातोरे, पर्यवेक्षक प्रा. प्रवीण टकले यांची प्रमुख उपस्थिती होती.

सत्काराला उत्तर देताना आणि आपले मनोगत व्यक्त करताना मा. सचिनराव लगड सर अत्यंत भावुक झाले होते. आपल्या प्रदीर्घ शैक्षणिक प्रवासाचा व कार्याचा लेखाजोखा मांडताना त्यांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. संस्थेचे दिवंगत अध्यक्ष स्व. शिवाजीराव नागवडे (बापू) यांच्या स्मृतींना उजाळा देताना ते म्हणाले,

आज मला मिळालेला हा सन्मान माझा एकट्याचा नसून, श्रद्धेय बापूंच्या आशीर्वादाची आणि त्यांनी रोवलेल्या शैक्षणिक रोपट्याची ही गोड फळे आहेत. बापू हे केवळ संस्थेचे अध्यक्ष नव्हते, तर आम्हा सर्व कार्यकर्त्यांचे आणि शिक्षकांचे छत्रछाया देणारे पितृतुल्य मार्गदर्शक होते. त्यांनी दाखवलेल्या तत्त्वांवर आणि ध्येयावर चालत राहिल्यामुळेच मला ही ओळख मिळाली. बापू आज आपल्यात भौतिकदृष्ट्या नसले, तरी त्यांचे विचार आणि प्रेरणा प्रत्येक क्षणी माझ्या कार्यात जिवंत आहेत. त्यांच्या ऋणात राहणे आणि त्यांनी दिलेला शैक्षणिक वसा शेवटपर्यंत जपणे हेच माझ्या आयुष्याचे परम कर्तव्य आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी यांनी लगड सरांच्या शिस्तबद्ध कार्यपद्धतीचे व समर्पित वृत्तीचे कौतुक केले. ते म्हणाले, एका खऱ्या अर्थाने कार्यतत्पर, कर्तव्यनिष्ठ आणि निष्कलंक व्यक्तिमत्त्वाला हा आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार' मिळाला आहे. योग्य व्यक्तीची योग्य वेळी झालेली ही कदर असून, या पुरस्कारामुळे संस्थेच्या आणि महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. या प्रसंगी संस्थेचे विश्वस्त प्रा. सुरेश रसाळ,



प्रा. सुनील माने आणि प्रा. नंदकुमार पवार यांनीही आपल्या मनोगतातून लगड सरांसोबत काम करतानाचे अनुभव सांगत त्यांच्या भावी वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

शिक्षक व कर्मचाऱ्यांची उत्स्फूर्त उपस्थिती

या सोहळ्यास वरिष्ठ, कनिष्ठ व उच्च व्यवसायिक अभ्यासक्रमातील सर्व प्राध्यापक, शिक्षकवृंद, कार्यालयीन अधीक्षक फैय्याज शेख प्रशासकीय कर्मचारी आणि सेवक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध आणि उत्साही वातावरणात पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शंकर गवते यांनी केले. उपप्राचार्य प्रा. सी. आर. कातोरे यांनी उपस्थितांचे मनः पूर्वक आभार मानले.

# गरजू रुग्णांसाठी 'रुग्ण उपयोगी साहित्य बँके'ला वैद्यकीय बेडची भेट

## सेवानिवृत्त प्राचार्य व ज्येष्ठ पत्रकार प्रकाश टाकळकर यांचा समाजोपयोगी उपक्रम

कोतूळ (समर्थ गांवकरी)

श्री वरद विनायक देवस्थान, कोतूळ यांच्या वतीने गरजू, गरीब व असहाय्य रुग्णांना आधार मिळावा, या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या 'रुग्ण उपयोगी साहित्य बँके'ला सेवानिवृत्त प्राचार्य व ज्येष्ठ पत्रकार मा. प्रकाश टाकळकर सर यांनी वैद्यकीय बेड भेट स्वरूपात दिला.

आजारपणाच्या काळात अनेक गरीब व गरजू कुटुंबांना वैद्यकीय उपचारांसोबतच आवश्यक साहित्याचीही मोठी अडचण भेडसावते. अशा परिस्थितीत रुग्णांना आवश्यक वैद्यकीय साहित्य उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने श्री वरद विनायक देवस्थानने हा समाजोपयोगी उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमाला टाकळकर यांनी दिलेली वैद्यकीय बेडची भेट निश्चितच मोलाची ठरणार आहे.

'मानवसेवा हीच ईश्वरसेवा' या भावनेतून केलेली ही मदत अनेक गरजू रुग्णांसाठी आधारवड ठरेल. रुग्णांना तसेच त्यांच्या कुटुंबीयांना आजारपणाच्या काळात मानसिक व आर्थिक आधार मिळावा, यासाठी अशा सामाजिक उपक्रमांची गरज असल्याचे देवस्थानच्या वतीने सांगण्यात आले.

प्रकाश टाकळकर यांच्या या सामाजिक योगदानाबद्दल श्री वरद विनायक देवस्थान, कोतूळ परिवाराच्या वतीने मनःपूर्वक आभार व कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. त्यांच्या या समाजोपयोगी कार्यातून इतरही दानशूर व्यक्ती व सामाजिक संस्थांना प्रेरणा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

रुग्ण उपयोगी साहित्य बँकेच्या माध्यमातून उपलब्ध होणारे साहित्य गरजू रुग्णांना आवश्यकतेनुसार उपलब्ध करून देण्यात येणार असून, या उपक्रमातून 'देवसेवेबरोबर मानवसेवा' या भावनेला प्रत्यक्ष कृतीची जोड मिळत आहे. या उपक्रमात गणेश भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आव्हान श्री वरद विनायक देवस्थानच्या वतीने प्रदीप भाटे, विनय समुद्र, संभाजी पोखरकर, कुलदीप नेवासकर, विशाल बोऱ्हाडे, सचिन पाटील, अजित आरोटे, डॉ कपिल कातोरे,सागर सोनुले, सुभाष घाटकर, संतोष नेवासकर, आदींनी केले आहे.

# कोतुळ येथील श्री वरदविनायक मंदिरात ऋषिपंचमीनिमित मंगळवारी समुदाईक अथर्व शीर्ष पठण

अकोले (समर्थ गांवकरी)

कोतुळ (ता. अकोले) येथील श्री वरदविनायक देवस्थानात ऋषिपंचमीनिमित्त मंगळवार, दि. १५ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ६ वाजता सामुदायिक अथर्वशीर्ष पठणाचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री गणेश उपासना ही ऐक्य, बंधुभाव, सामाजिक एकोपा आणि राष्ट्रीय एकात्मतेला बळ देणारी असल्याने श्री वरदविनायक देवस्थानाच्या वतीने विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम वर्षभर राबविण्यात येतात. त्याच अनुषंगाने ऋषिपंचमीच्या पवित्र दिनाचे औचित्य साधून सामुदायिक अथर्वशीर्ष पठणाचे आयोजन करण्यात आले आहे.



कोतुळ परिसरात सामुदायिक अथर्वशीर्ष पठणाला गेल्या काही वर्षांपासून भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. पहाटेच्या प्रसन्न वातावरणात शेकडो गणेशभक्तांच्या सामूहिक पठणामुळे मंदिर परिसर भक्तिमय होतो.

# भोकरवर जलसंकटाची छाया; पावसासाठी मुस्लिम बांधवांची ईदगाहवर सामूहिक दुआ

## 'सुधा' प्रकल्पात अल्प पाणीसाठा; पिके व पशुधनासाठीही चिंता





भोकर (समर्थ गांवकरी)

भोकर शहरासह परिसराची तहान भागविणाऱ्या 'सुधा' प्रकल्पात यंदा अपेक्षित पाऊस न झाल्याने पाणीसाठा अत्यल्प राहिला आहे. त्यामुळे शहराच्या पाणीपुरवठ्यासह शेती व पशुधनाच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर पावसासाठी मुस्लिम समाजाच्या वतीने शुक्रवारी (दि. ११) ईदगाह मैदानावर विशेष नमाज व सामूहिक दुआ करण्यात आली.

दुपारी तीन वाजता झालेल्या या विशेष नमाजचे मार्गदर्शन मौलाना रिजवानोद्दीन इनामदार नदवी यांनी केले. त्यानंतर मुफ्ती अदिबोद्दीन इनामदार कासमी व मुफ्ती इमरान कासमी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यंदा पावसाने मोठी उघडीप दिल्याने 'सुधा' प्रकल्पातील पाणीसाठा चिंताजनक पातळीवर पोहोचला आहे. या प्रकल्पावर भोकर शहराच्या पिण्याच्या पाण्यासह परिसरातील शेती मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. पाण्याअभावी खरीप पिके सुकू लागल्याने शेतकऱ्यांसमोरही संकट उभे ठाकले आहे.

पावसासाठी आयोजित विशेष नमाजसाठी शहर व परिसरातील मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने ईदगाह मैदानावर उपस्थित होते. पाऊस पडून 'सुधा' प्रकल्प भरावा, खरीप पिकांना जीवदान मिळावे तसेच पशुधनासाठी चारा-पाण्याची उपलब्धता व्हावी, यासाठी सामूहिक दुआ करण्यात आली.

# वसुंधरा अकॅडेमी मध्ये विद्यार्थ्यांनी बनवले इको फ्रेंडली गणपती : विद्यार्थ्यांची पर्यावरणपूरक सृजनशीलता

अकोले (समर्थ गांवकरी)

अभिनव शिक्षण संस्था, अकोले संचालित वसुंधरा अकॅडेमी या शाळेमध्ये आज विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक गणपतींची सुंदर निर्मिती करून एक वेगळा संदेश दिला. शाळेत आयोजित करण्यात आलेल्या 'इको फ्रेंडली गणपती स्पर्धांमध्ये' मध्ये इयत्ता पाचवी ते आठवी च्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला आणि शाडू मातीचा वापर करून बाप्पांची आकर्षक मूर्ती बनवल्या. वसुंधरा अकॅडेमीच्या कलाशिक्षिका काजल डावखर यांनी विद्यार्थ्यांना इको फ्रेंडली गणपती बनवण्याचे प्रशिक्षण दिले.

या उपक्रमामागचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाची जाणीव निर्माण करणे हा होता. प्लास्टर ऑफ पॅरिस व




रासायनिक रंगांमुळे जलप्रदूषण होते, हे लक्षात घेता शाळेने विद्यार्थ्यांना नैसर्गिक आणि पुनर्वापर करता येणाऱ्या साहित्यांचा वापर करण्याचे प्रोत्साहन दिले. प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी तयार केलेले गणपती केवळ कलात्मकच नव्हते, तर प्रत्येक मूर्ती मागे एक सामाजिक किंवा पर्यावरणीय संदेश देखील होता. कुणी जलसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले, तर कुणी झाडे लावा, पर्यावरण वाचवा हा संदेश दिला. संस्थेचे अध्यक्ष मा. मधुकरराव नवले, सचिव विक्रम नवले, कोषाध्यक्ष डॉ. जयश्री देशमुख, सहसचिव प्राचार्य अल्फोन्सा डी. , सर्व पदाधिकारी, सर्व विभागांचे प्राचार्य व सर्व पालकांनी शाळेच्या या अभिनव उपक्रमाचे कौतुक केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता, सामाजिक जाणीव आणि पर्यावरणाबाबतची जबाबदारी या सर्व गोष्टींचा समतोल साधला गेला.

# राष्ट्रीय लोकअदालतीत ८२६५ प्रकरणे निकाली;५ कोटी १८ लाखांची तडजोड

## वेळ, पैसा आणि श्रम वाचविण्यासाठी लोकअदालतीचा लाभ घ्या : जिल्हा न्यायाधीश डी. पी. शिंगाडे

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

न्यायालयीन प्रकरणांमध्ये वेळ आणि पैसा खर्च होण्याबरोबरच पक्षकारांना मानसिक त्रासालाही सामोरे जावे लागते. त्यामुळे पक्षकारांनी जास्तीत जास्त प्रकरणे लोकअदालतीच्या माध्यमातून तडजोडीने निकाली काढून वेळ, पैसा आणि श्रम वाचवावेत, असे आवाहन जिल्हा न्यायाधीश डी. पी. शिंगाडे यांनी केले.

श्रीगोंदा जिल्हा न्यायालयात शनिवारी (दि. १२) राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

मोटार अपघाताच्या प्रकरणांचा निकाल लागण्यास अनेकदा चार ते पाच वर्षांचा कालावधी लागतो. मात्र, लोकअदालतीमध्ये विमा कंपनीचे अधिकारी, पक्षकार आणि विधिज्ञ एकाच दिवशी उपलब्ध होत असल्याने योग्य संवादातून अशी प्रकरणे जलदगतीने निकाली काढण्यास मदत होते. अपघातानंतर उपचारासाठी मोठ्या रकमेची आवश्यकता असलेल्या कुटुंबांना प्रकरण तडजोडीने निकाली निघाल्यानंतर नुकसानभरपाईची रक्कम लवकर मिळू शकते. त्यामुळे पक्षकारांचा आर्थिक तसेच मानसिक त्रास कमी होतो, असे शिंगाडे यांनी सांगितले. वरिष्ठ न्यायालयाचे न्यायाधीश ए. एम. मुजावर यांनीही लोकअदालतीचे महत्त्व स्पष्ट केले. पक्षकारांच्या परस्पर तडजोडीने प्रकरण निकाली निघाल्याने न्यायालयीन प्रक्रियेतील वेळ, पैसा आणि श्रमाची बचत होते. लोकअदालतीमध्ये निकाली निघालेल्या प्रकरणावर पुढील अपीलची शक्यता नसल्याने पक्षकारांना दीर्घ न्यायालयीन प्रक्रियेपासून दिलासा मिळतो. प्रलंबित तसेच दाखलपूर्व प्रकरणेही लोकअदालतीमध्ये घेतली जात असल्याने त्याचा लाभ सर्व पक्षकारांनी घ्यावा, असे त्यांनी आवाहन केले.

श्रीगोंदा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. जे. बी. शिंदे यांनी लोकअदालतीचे फायदे आणि महत्त्व याबाबत पक्षकारांना मार्गदर्शन केले. जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी पक्षकारांनी पुढाकार घ्यावा, असे त्यांनी सांगितले.

८२६५ प्रकरणांचा निपटारा

या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये मोटार अपघात, भूसंपादन, कौटुंबिक वाद, दिवाणी व फौजदारी प्रलंबित प्रकरणांसह ग्रामपंचायत, नगरपालिका, बँका आणि महावितरणची दाखलपूर्व प्रकरणे ठेवण्यात आली होती. उपलब्ध आकडेवारीनुसार ८२६५ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून, एकूण ५ कोटी १८ लाख ९४ हजार १७९ रुपयांची तडजोडीची रक्कम निश्चित झाली.

दाखलपूर्व प्रकरणांमध्ये ८२४२ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून, त्यातून १ कोटी ६४ लाख ३४ हजार ६८९ रुपये वसूल झाले.

तसेच दाखल प्रकरणांमध्ये ७७ प्रकरणे निकाली निघाली असून, त्यामधून ३




कोटी ५४ लाख ५९ हजार ४९० रुपयांची तडजोडीची रक्कम झाली.

या लोकअदालतीस न्यायालयीन अधिकारी, वकील, विविध शासकीय विभागांचे अधिकारी-कर्मचारी, बँक अधिकारी, ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक, नगरपरिषद व महावितरणचे अधिकारी-कर्मचारी, पोलीस कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने पक्षकार उपस्थित होते.

उपस्थिती : जिल्हा न्यायाधीश डी. पी. शिंगाडे, तदर्थ जिल्हा न्यायाधीश एम. एम. राव, सहदिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर एस. पी. केकाण, द्वितीय सहदिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर ए. एम. मुजावर, सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर पी. व्ही. पाटील यांच्यासह श्रीगोंदा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. जे. बी. शिंदे, श्रीगोंदा-कर्जत-जामखेड बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. एस. वाय. पत्की व ॲड एस पी राऊत (चव्हाण) ॲड वडवकर,अन्य विधिज्ञ उपस्थित होते.